## प्रकरण : 5 वे

# उपसंहार

पृष्ठ क्रमांक 73 ते 78

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## प्रकरण : 5

## उपसंहार

प्रस्तुत लघुप्रबंधात सखा कलाल यांच्या कथांचा अभ्यास करण्यासाठी पहिल्या प्रकरणात ग्रामीण साहित्याची प्रेरणा, मराठी ग्रामीण कथा व तिचे थोडक्यात स्वरुप याविषयी चर्चा करुन मराठी ग्रामीण कथेचा उदय व विकासातील टप्पे याचा आढावा घेतला आहे.

1897 च्या दुष्काळाचे चित्रण करणारी "काळ तर मोठा कठीण आला" ही हरिभाऊंची गोष्ट ग्रामीण कथेच्या जन्माची खूण मानली जाते. मात्र श्री. म. माटे यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व जाते. 1945 च्या सुमारास मराठी कथेमध्ये महत्वपूर्ण परिवर्तन घडले व नवकथा उदयाला आली. ग्रामीण कथेतही मूल्यात्मक फरक झाला. ग्रामीण कथेला आशयाच्या, अभिव्यक्तीच्या अंगाने समृध्द करण्याचे काम व्यंकटेश माडगूळकरांनी केले. माडगूळकरांच्या कथेने ग्रामीण कथेला नवकथेच्या शेजारी आणून बसविले. माडगूळकरांनी मराठी ग्रामीण कथेचे आद्य व अभिजात पीठ स्थापन केले. हरिभाऊ आपटे पासून व्यंकटेश माडगूळकरांपर्यंत ग्रामीण कथेत कसा फरक पडत गेला याविषयीची चर्चा केली आहे. माडगूळकरांनंतर ज्या महत्वाच्या ग्रामीण कथाकारांनी भर घातली याचाही आढावा घेतला आहे.

1960 सालापासून नव्या नव्या विकास योजना खेडयापाडयात राबू लागल्या, कारखाने निघाले. शिक्षणाचा प्रसार झाला. एक नवी पिढी नव्या जाणिवेने लिहू लागली. या पिढीतील

महत्वाचे ग्रामीण कथाकार - आनंद यादव, रा.रं. बोराडे, महादेव मोरे, सखा कलाल, चंद्रकुमार नलगे, चारुतासागर हे होत. त्यामुळे सखा कलाल समकालीन कथाकारांच्या कथांविषयी थोडक्यात विवेचन केले आहे.

दुस-या प्रकरणामध्ये सखा कलालांचा व्यक्तिगत व साहित्यिक परिचय करुन दिला आहे. त्यामध्ये संपूर्ण नांव, कलालांचा जन्म, तारीख, जन्मगांव, शिक्षण याविषयी माहिती दिली आहे. शिक्षण घेत असताना वाचनाची आवड कशी निर्माण झाली? त्या काळात कोणती पुस्तके वाचली? त्यांचे आवडते साहित्यिक कोण? त्यांनी लेखनास सुरुवात केव्हा केली? पहिली कथा कधी प्रसिध्द झाली? पहिला कथासंग्रह केव्हा प्रसिध्द झाला? दुसरा कथासंग्रह केव्हा प्रसिध्द झाला? याविषयी सविस्तर माहिती दिली आहे.

तिस-या प्रकरणामध्ये "ढग" आणि "सांज" या कथासंग्रहाच्या आधारे "कलालांच्या कथांची आशयदृष्टया वैशिष्टये" याविषयी सोदाहरण चर्चा केली आहे.

कलालांच्या कथा ग्रामीण जीवनावरच्या असल्यातरी ग्रामीण समाजजीवनापेक्षाही तेथील व्यक्तींच्या दैनंदिन जीवनातील सुखदु:खाचे प्रसंगच त्यांच्या कथेत अधिक प्रमाणात आलेले आहेत. कलालांच्या कथा तशा कुटुंबाच्या कथा आहेत, संसारातील दु:ख टिपणा-या कथा आहेत, परंतु मनातील द्वंद्व अथवा अस्वस्थता अत्यंत समर्थपणे ते टिपतात. मनाच्या तरंगत्या अवस्थांचे चित्रण त्यांच्या कथेतून आलेले आहे. निसर्गातील अनेक प्रतिमांच्या माध्यमातून मानवी मनाचे प्रत्ययकारी दर्शन त्यांच्या कथांतून घडते.

कलालांच्या कथेने सर्वसामान्यांच्या आयुष्यातील सुखदु:खाला विशेषत: सामान्यपणे जाणवणार नाही अशा सूक्ष्म दु:खाला स्पर्श केला आहे. मात्र हा स्पर्श वरवरचा नाही, तर तलस्पर्श आहे. ग्रामीण जीवनातल्या वरवरच्या आणि ढोबळ दु:खापेक्षा सूक्ष्म दु:खाचा वेध घेतला आहे. ही दु:खे अशी आहेत की, वरवर पाहिले तर ती दिसत नाहीत. पण आतून मात्र ती शरीर पोखरत राहतात. त्यांच्या कथेतील दु:ख भोगणारी माणसे खेडूत असली तरी त्यांच्या दु:खाची जात थोडीशी वेगळी आहे. अशी दु:खे संयमाने व आर्ततेने मांडली आहेत.

कलालांच्या कथेत विषयवैविध्य आहे. त्यांनी प्रौढमनाप्रमाणेच खेडयातील बालमनाचे व किशोर अवस्थतील मुलांच्या भावनांचेही चित्रण केले आहे. लहान मुलांच्या निरागस मनाचे दर्शन काही कथांतून घडते. निष्पाप, निरागस लहान मुलांच्या भावचित्रणाबरोबरच किशोरवयातील/पौगंड अवस्थेतील मुलांच्या भावनांचे चित्रण आले आहे. शरीरातील बदलाची जाणीव नेटकीच होऊ लागते. शरीराला कसली तरी अनामिक ओढ वाटते. नेमके काय हवे ते मात्र कळत नाही. किशोर वयातील मुलांची अशी अवस्थाही कांही कथांतून प्रकट झाली आहे.

कलालांच्या काही कथांमधून तरुण मनाच्या तारुण्यसुलभ भावनांचे चित्रण आले आहे. ऐन तारुण्यामध्ये वासनेचे हुंकार दडपताना होणा-या यातनांचे व त्यापायी घडणा-या प्रमादांचे दर्शन कलालांनी अत्यंत संयत भाषेत घडविले आहे. पळून जाणा-या तरुण जोडप्याचेही चित्रण कलालांच्या कथेतून आले आहे. तरुण स्त्रीच्या जीवनाचे वास्तवरुप आणि तिच्या मनाचे बदलणारे रंग याचेही सुंदर चित्रण आले आहे.

ग्रामीण माणसांचे दारिद्रयातील भोग भोगत जगणे त्यांना चांगले ज्ञात आहे. माणूस अशिक्षित असला, गरीब असला तरी त्याच्याही जीवनविषयक आशा-आकांक्षा असतात. अज्ञान आणि दारिद्रियापोटी त्या आशा-आकांक्षाचे कोंब जळून जातात. तरी जगणे अपरिहार्य असते, आहे तेच कवटाळीत बसावे लागते. अशी दरिद्री जीवनाची विविध रुपे कलालांच्या कथांतून अभिव्यक्त होतात. त्यातून दारिद्रयामुळे उपसावे लागणारे अपार कष्ट, या कष्टमय जीवनातही जगण्याची उमेद बाळगणारी माणसे दिसतात.

कलालांच्या काही कथांतून ग्रामीण अंधश्रध्देचे चित्रण आले आहे. त्यामध्ये लोकसमज, शकुन-अपशकून, करणी, नवस, भूतबाधा इत्यादी गोर्ष्टीचे चित्रण आले आहे. भाऊबंदाच्या घरावरुन नांगर फिरवण्याची जिद्द बाळगलेली माणसे अनेक ग्रामीण कथाकारांच्या कथांमध्ये आढळतात. कलालांच्या कथेमध्येही अशा भाऊबंदकीचे चित्रण आले आहे.

कलालांच्या कथेतून निसर्गाची अनेक वर्णने येतात. त्यांच्या कथांतून प्रकटणारा परिसर हा डोंगरद-या आणि जंगलाचा आहे. माणसांच्या भाव-भावनांशी समांतर असा निसर्ग कलालांच्या

कथेत अवतरतो. डोंगराच्या कुशीत वसलेल्या आडवळणाच्या गावाची चित्रणेही काही येतात. कलालांच्या कथेतून ऊन-पावसाची, वा-या-वादळाची, त्याचप्रमाणे झाडा-झुडपांची, जनावरा-पाखरांचीही चित्रणे येतात. परंतु शेती आणि शेतीतील कामांची चित्रणे मात्र सहसा येत नाहीत.

मनातील अत्यंत तरल भाव टिपण्यात कलालांची लेखणी तरबेज आहे. माणसाच्या मनात येणारे परस्पर विसंगत विचार, त्या विचारांमुळे अस्वस्थ झालेले मन, त्यावेळची त्याची दोलायमान अवस्था याचे चित्रण कलाल मोठया कौशल्याने आणि बारकाव्यानिशी करतात. कथेतील पात्रांचा स्वतःच्याच मनाशी चाललेला स्वगतात्मक संवाद अगदी सूक्ष्मतेने टिपला आहे. मनोविश्लेषणात्मक पध्दतीने मनाचा आविष्कार घडवीत असताना कलालांनी निसर्गाचा वापर केला आहे. ग्रामीण माणसांच्या मनातील भाव-भावनांचे, त्यांच्या मनावरील ताण-तणावाचे आणि गुंतागुंतीचे चित्रण अनेक कथांतून आले आहे. जीवनातील पेच-प्रसंग आणि मनाची होणारी उलघाल यांचे प्रत्ययकारी चित्रण हे सखा कलालांचे फार मोठे सामर्थ्य आहे. ग्रामीण माणसांच्या मनाचे विविधांगी चित्रण कलालांच्या अनेक कथांमधून येते.

चौथ्या प्रकरणात कलालांच्या कथारचनेच्या वैशिष्टयांची सोदाहरण चर्चा केली आहे. त्यामध्ये कथानकरचना, कथेचा प्रारंभ-शेवट, वातावरणनिर्मिती, व्यक्तिदर्शन, संवाद आणि भाषाशैली या वैशिष्टयांचा आढावा घेतला आहे.

कलालांच्या संवेदनेची आणि अभिव्यक्तीची रीत सूक्ष्म आणि अबोल आहे. त्यांच्या कथावस्तूच्या मांडणीत एक फसवा हळवेपणा आहे. प्रथम वाचनात बहुतेक कथा मनावर केवळ सरकून जातात. खोल परिणाम करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे असे वाटत नाही. थोडे अधिक काळजीपूर्वक वाचायचे ठरवले तर मात्र जागरुक कलावंत मनाचा कानोसा येतो. कलालांच्या कथा या लहान वाटतात. पण कथा लहान आहे. म्हणून चटकन मनावेगळी करावी वाटत नाही. उलट तिच्यात काहीतरी खोलवरचे दडलेले आहे. आपण ती पुन्हा लक्षपूर्वक वाचली पाहिजे असे वाटते. कलालांच्या कथेचा प्रारंभ सूचक, लक्ष्यवेधी व कुतूहल निर्माण करणारा, उत्कंठा वाढविणारा आहे.

आकर्षक निवेदनाने, निसर्गवर्णनाने केलेला प्रारंभ, फुलविलेला मध्य आणि विस्मयजनक, परिणामकारक शेवट हे कलालांच्या कथांचे वैशिष्टय मानावे लागेल. कलालांच्या मनाच्या संज्ञाप्रवाही मनोविश्लेषणाकडे अधिक कल असल्याने भाववृत्तीला पोषक असे वातावरण/पार्श्वभूमी निर्माण करण्याकडे कल दिसतो. कथेतील घटना-प्रसंग आणि व्यक्तिस्वभाव यातील कार्यकारणभाव अधिक स्पष्ट करण्यासाठी कलालांनी कथेमध्ये वातावरणनिर्मितीही केलेली दिसून येते. मानसिक ताण-तणावांचे जाळे अधिकाधिक गडद करण्यासाठी पार्श्वभूमीचा उपयोग केला आहे. निसर्गातील प्रतिमा वापरुन मनःस्थितीवर प्रकाश टाकला आहे. मानवी मनाच्या मनःस्थितीला अनुकूल अशी वातावरणनिर्मिती केलेली आहे.

कलालांच्या कथेतून भेटणारी सर्व माणसे सामान्य आहेत, गरीब आहेत, पण ती एकमेकांच्या आधाराने जगू पाहणारी, सुख देऊ पाहणारी आहेत. कलालांच्या कथेतील पात्रे माणुसकी जपणारी आहेत. दारिद्रय हे पाचवीला पुजलं असलं तरी, आहे यात समाधान मानणारी माणसे कलालांच्या कथेतून दिसतात. काही कथेतून विकृत स्वभावाची पात्रेही भेटतात. अशी व्यक्तिचित्रणे रेखाटताना पात्रांच्या हालचाली, त्यांच्या आवाजातील चढ-उतार इ. बारीक तपशीलाकडे कलालांचे सूक्ष्म लक्ष दिसते. प्रौढ व्यक्तींप्रमाणेच खेडयातील किशोरवयातील मुलामुलींचेही चित्रण काही कथांतून आलेले आहे. कलालांच्या कथेतील व्यक्तिचित्रे स्वभावाच्या विविध छटांनी नटलेली आहेत. बाह्यतपशीलाकडे कमी लक्ष देऊनही कलालांची व्यक्तिचित्रे अपुरी वाटत नाहीत. कलालांच्या कथेतील पात्रांच्या सोशिकवृत्तीमुळे कथा वाचताना वाचकांच्या मनावर खोल ठसा उमटतो.

कलालांच्या कथेतील संवाद हे प्रचारकी थाटाचे नाहीत, तर ते व्यक्तीची मनोवस्था व्यक्त करणारे परिणामकारक संवाद आहेत. विविध प्रसंगाच्या निमित्ताने व्यक्तीच्या मनाची होणारी उलघाल, अस्वस्थता व्यक्त करण्यासाठी कलाल संवादाचा उपयोग करतात. पात्रांच्या अंतःकरणातून सहज उमटलेले भाव कलालांच्या संवादातून व्यक्त झाले आहेत. असे संवाद कथेशी एकरुप झालेले आहेत. त्यांच्या कथेतील अत्यंत मोजक्या शब्दातील संवाद वाचकांना खूप काही सांगून जातात. हे संवाद वास्तव आणि स्वाभाविक आहेत. कथेची परिणामकारकता वाढविण्यास उपयुक्त ठरले आहेत.

कलालांनी संवादासाठी ग्रामीणबोलीभाषेचा वापर केला आहे. परंतु कथानिवेदनासाठी नागरी व ग्रामीण भाषेचे मिश्रण ( Blending ) केले आहे. कथानिवेदनात ग्रामीण भाषेपेक्षा नागरी भाषेचा प्रभाव अधिक आहे. कलालांनी इतर ग्रामीण कथाकारांप्रमाणे संपूर्ण कथा ग्रामीण बोलीभाषेत लिहिली नसली तरी कलालांची भाषाशैली कथेतून प्रकट होणा-या अनुभवविश्वाशी एकरुप झालेली दिसते. अनुभवातील तरलता नेमक्या शब्दात आणि वाक्यात पकडण्याचे कलालांचे कौशल्य लक्षात घेण्यासारखे आहे.

कलालांच्या कथालेखनाचे स्वरुप भडक, नाटयमय, झगझगीत अगर जळजळीत असे नाही. ते अत्यंत सौम्य, मंद, तरल, तलम असे आहे. त्यांची कथा कलागुणांच्या दृष्टीने चांगली आहे. मात्र ग्रामीणतेची सगळी वैशिष्टये सामावून घेण्याइतका तिचा आवाका मोठा नाही. कलालांच्या कथेला ते अभिप्रेतही नाही. मानसशास्त्रीय पातळीवरुन मानवी मनाच्या सहजप्रवृत्तीचे दर्शन कलालांची कथा घडविते. संसारातील, कुटुंबातली एकमेकांविषयी असणारी आस्था, कणवेची आणि मायेची भावना, या भावनेमुळे मनात निर्माण होणारे कल्लोळ यांचेच चित्रण करतात. त्यामुळे शेती व्यवसाय किंवा तत्संबंधीचे इतर व्यवसाय याचे फारसे चित्रण त्यांच्या कथेत आढळत नाही. मनोविश्लेषणात्मक पध्दतीने मनाचा आविष्कार घडवीत असताना त्यांनी निसर्गाचा वापर केला आहे. "आनंद यादवांच्या नंतर समर्थपणे मनोविश्लेषणात्मक कथा लिहिणारे कथाकार म्हणजे सखा कलाल" असे म्हटले तर वावगे ठरु नये. मनातील अत्यंत तरल भाव टिपण्यात कलालांची लेखणी तरबेज आहे. मनाच्या तरंगत्या अवस्थांची चित्रणे बहुतांशी कथांतून आलेली आहेत. आपल्या शांत आणि संयत आविष्काराने अस्वस्थ करणारी, वेगळया "मूड" चे दर्शन घडविणारी कलालांची कथा ही आपले वेगळेपण स्पष्ट करते. ग्रामीण बाहयांगाची जपणूक करावी असा त्यांचा कटाक्ष नाही. ग्रामीणच नव्हे तर एकंदरीत जीवनाच्या तळाशी वावरणारे जे असेल त्याला स्पर्श करावा अशी त्यांची इच्छा दिसते. सखा कलालांचा लेखनवेग तसा मंदच आहे. तरीही त्यांनी लिहिलेल्या मोजक्याच कथा उत्तम दर्जाच्या आहेत.

- - -

# साहित्यिक चळवळ आणि ग्रंथालये

– सखा कलाल

चळवळ या शब्दाचा अर्थ जागृती, चेतना, प्रचार असाही आहे. आपली भूमी ही खरी गरीब शेतकऱ्यांची आणि कष्टकऱ्यांची आहे. या बहुजन समाजाला महात्मा फुले, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीची ऐकून माहिती आहे. पण या तिघांवरही भरपूर ग्रंथ लिहिले गेलेले आहेत आणि या तिघांच्याही कार्याची ओळख करून घ्यायची असेल तर ग्रंथालयांवर अवलंबून राहावे लागणार. याचाच अर्थ, ग्रंथ आणि ग्रंथालये ही माणसांच्या मागच्या पिढ्यांचा वारसा येणाऱ्या पिढ्यांना उपलब्ध करून देतात. सामाजिक आणि राजकीय चळवळींचे लोण खेड्यापर्यंत पोहोंचू शकते. पण साहित्यिक चळवळ मात्र शहरी व सुशिक्षित वर्गापुरतीच मर्यादित राहिलेली आहे. एकदंरीत साक्षरतेचे प्रमाण लक्षात घेता हे असे होणार हे उघड आहे. तथापि गेल्या एक दोन दशकात आधुनिक यंत्रे आणि तंत्रज्ञानाची घोडदौड ग्रामीण भागातल्या झोपड्यांपर्यंत पोहोंचलेली आहे. दैनिके, आकाशवाणी, दूरदर्शन वीज, मोटार, ट्रॅक्टर, फटफट अशा कितीतरी गोष्टी ग्रामीण जीवनात नवे रंग भरीत आहेत. नवीनतेचे, आधुनिकतेचे वारे खेड्यातल्या झोपड्यापर्यंत घोंगावतांना दिसू लागले आहे. लिहावे, वाचावे, शिकावे आणि चांगले नीटनेटके जगावे असे प्रत्येकालाच वाटत असते. स्वातंत्र्य मिळून चार दशकांहून अधिक काळ उलटलेला असून लोकशाहीचे सगळेच गुणदोष अधिक गडद झालेले दिसू लागलेले आहेत. किंबहुना गुणापेक्षा दोषच अधिक ठळकपणे अनुभवाला यायला लागले आहेत. स्वार्थ, भ्रष्टाचार, अनाचार, अनीती, ढोंग हे ठिकठिकाणी दिसत असून माणसापेक्षा पैशाला, नीतीपेक्षा अनीतीला, सत्यापेक्षा असत्याला आणि सामाजिकतेच्या ठिकाणी ढोंगीपणाला महत्व येत चाललेले दिसू लागले आहे. गावोगावी अजून शाळा नाहीत. शाळा असलीच तरी शाळेला स्वतंत्र इमारत नाही, इमारत असली तरी तिथे खडू-फळा नाही, सगळे आहे परंतु शिक्षकच नाही अशी कांहीशी विचित्र परिस्थिती दिसून येत असली तरी प्रत्येक गावात शाळा असलीच पाहिजे असे आमच्या मायबाप सरकारला व समाजचिंतकांना वाटू लागले आहे हे सुध्दा कमी नाही! गावोगावी आरोग्य केंद्रे असली पाहिजेत, ग्रंथालये असली पाहिजेत असे नेतेमंडळी बोलून दाखवितांना दिसतात. पंचायतींनी ग्रामविकासाची शपथ खाऊन गावातले रस्ते, वीज, पाणी यांची किमान व्यवस्था करावी अशी जनतेची अपेक्षा असते. शेतीला व तिच्या पूरक उद्योगांना वाव मिळाला पाहिजे; रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत, अन्न, वस्त्र, निवारा, या जगण्याच्या किमान गरजा तरी सर्वांच्या भागतात काय हा खरा चिंतेचा प्रश्न आहे. या मूलभूत गरजा भागल्या नंतरच व्यक्तीचे खरे आंतरिक जीवन सुरू होते. संस्कृतीची वाट व्यक्ती, समूह किंवा सबंध समाज यांच्या विकासातून जात असते; शिक्षण, तत्त्वज्ञान आणि कला या तिच्या दिशा असतात असे टी. एस. इलियट या थोर विचारवंताने म्हटलेले आहे. साहित्य, कला, संस्कृती- या उपाशीपोटी सुचणाऱ्या गोष्टी नव्हेत. जोपर्यंत समाजातल्या घटकांच्या मूलभूत गरजा भागत नाहीत व जोपर्यंत दूरदूरच्या ग्रामीण भागातल्या झोपड्यांपर्यंत साक्षरतेचा प्रकाश पोचत नाही तोपर्यंत ही साहित्यिक चळवळ मूठभरांची किंवा शहरातल्या शिक्षित परीटघडी वाङ्मयाचीच राहाणार हे अगदी उघड आहे.

शहरे ही आर्थिक उलाढालींची फार मोठी केंद्रे बनलेली असून याचा कला आणि साहित्य यांच्यावरही प्रभाव पडत आलेला आहे. मोठमोठी सभा संमेलने, चर्चासत्रे, अधिवेशने ही शहरातूनच भरविली जातात. मोठमोठी प्रदर्शने, नाट्यगृहे, ही शहरातूनच बघायला मिळतात. या सर्वांचा आश्रयदाता वर्गही शहरातलाच असतो. होतकरू कलावंत किंवा साहित्यिक स्वतःचे नशीब काढण्यासाठी शहराकडे धाव घेतांना दिसतात. कितीतरी लेखक, कवी, विचारवंत शहरातच आपला जम बसवितात. लेखक, वाचन, चिंतन या गोष्टीला शहरामध्ये अनुकूलता विशिष्ट दर्जा सांभाळून जगता येते हे दुसरे महत्वाचे कारण आहे. लेखक, कवी, विचारवंत यांची अक्षरदौड अव्याहतपणे चालू असते. या दौडीत अमके अमक्या दशकातले तर तमके तमक्या दशकातले असा फरक समीक्षक करीत असतात. दैनिकाच्या रविवार आवृत्या, मासिके, साप्ताहिके, वार्षिके आणि बाजारात येणारी नवनवीन पुस्तके पाहिली की, हा लिहिण्या-छापण्याचा धंदा किती तेजीत आहे हे सहज कळण्यासारखे आहे. एवढे अफाट लिहिले-छापले जाते ते कुणासाठी? ते सर्व साहित्य विकत घेऊन वाचणे किंवा संग्रह करणे हे एका व्यक्तीच्या ताकदीबाहेरचे आहे. लेखकाने लिहिले. प्रकाशकाने ते छापले. पण या कामाची इथें पूर्तता झाली असे वाटले तरी, ती खरी पूर्तता नसते. छापलेले वाचण्यातच त्या लेखकाचा खरा सन्मान असतो. लेखक आणि त्याचा वाचक या दोघांना एकत्र आणण्याचे काम ग्रंथालये करीत असतात. ग्रंथालये ही आधुनिक काळातली देवालये असून ग्रंथपालन हा अन्य व्यवसायांच्या तुलनेने अत्यंत सोज्वळ असा सेवाधर्म आहे. असे असूनही ग्रंथालये आणि ग्रंथपाल हे कांहीसे उपेक्षित व दुर्लक्षित राहिलेले आहेत. जीवनातल्या अनेक चांगल्या मूल्यांची परवड झालेली दिसत असून हा कलीयुगाचा महिमा तर नाही ना असे खेदपूर्वक म्हणावेसे वाटते.

फार पूर्वी नालंदा, तक्षशीला इथें भव्य आणि समृध्द ग्रंथालये होती. परकीयांच्या आक्रमणामुळे कालौघात ही

ग्रंथालये नष्ट झाली हा इतिहास आहे. आजची ग्रंथालये ही स्वकीयांच्या स्वार्थी आणि हीन वृत्तीमुळे नष्ट होतील की काय, अशी भीती वाटावी अशी सध्याची परिस्थिती आहे. स्पष्टच सांगायचे तर, १) बहुतेक ग्रंथालयाना त्यांना पोषक अशी स्वतंत्र इमारत असत नाही. आधुनिक पध्दतींची खर्चिक म्हणून हेटाळणी केली जाते. २) कांही कांही ग्रंथालयात अद्याप प्रशिक्षित ग्रंथपाल नेमला जात नाही. पुस्तके देणे आणि घेणे हे एवढेच तर काम असते अशा अडाणीपणाच्या पूर्वग्रहदूषीत समजाला संस्थाप्रमुख घट्ट चिकटलेले असतात. ३) प्रशिक्षित ग्रंथपाल नेमावा लागला तरी त्याला योग्य व पुरेसे वेतन दिले जात नाही. जगात सगळीकडे ग्रंथपालाला शिक्षक समजण्यात येते, भारतात त्याला कारकुनापेक्षा जास्त किंमत दिली जात नाही. ४) क्वचित पुरेसे मदतनीस ग्रंथालयात नेमलेले असले तरी वरिष्ठांकडून या सेवकांचा उपयोग ग्रंथाबाहेरच्या कामासाठी करून घेतला जातो. (उदा. प्राचार्यांनी ग्रंथालय सेवकांना स्वतःच्या घरच्या कामासाठी घरगडी म्हणून राबवून घेणे-) ५) ग्रंथालयात जे एक दोन मदतनीस नेमलेले असतात ते फारसे प्रशिक्षित असत नाहीत. बऱ्याच वेळा नडलेले, दुसरीकडे कुचकामी ठरलेले, नगास नग या हिशेबाने त्यांना ग्रंथालयाकडे ढकललेले असते. ६) लोकशाही पध्दतीपेक्षा वरिष्ठांच्या मनमानी कारभाराच्या भोंगळ पध्दतीनुसार ग्रंथालये कामे करीत असतात. याचे अनिष्ट परिणाम ग्रंथ, ग्रंथपाल आणि वाचक यांना भोगावे लागतात. ७) बहुतेक सर्व प्रकारची ग्रंथखरेदी संस्थाप्रमुखांच्या/प्राचार्यांच्या लहरीनुसार केली जाते. यामुळे ग्रंथालयांची उपयुक्तता मारली जात. ८)ग्रंथ अधिकाधिक वाचले जावेत असे प्रयत्न करण्यापेक्षा ते कडीकुलुपात सुरक्षित ठेवण्याकडेच संस्थाप्रमुखांचा/ प्राचार्यांचा कल असतो. त्यामुळे कांही कांही ग्रंथालयांना गुदामाची अवकळा आलेली दिसून येते. ९) ग्रंथपालन हे शास्त्र असून त्याचे योग्य तऱ्हेने संवर्धन झाले पाहिजे याची जाण सर्वच प्राचार्य, संस्थाप्रमुख, वाचक, साहित्यिक, शासकीय अधिकारी, सामाजिक नेते यांना असलेली दिसून येत नाही.

ग्रंथालये ही पाणपोई सारखी असतात. तहानलेल्या वाटसरूलाच पाणपोईचे महत्व कळणार. पण हल्ली हल्ली ही ज्ञान मिळविण्याची तहान अभावानेच आढळून येते. हा शिक्षण पध्दतीचा दोष तर नसेल? विद्यार्थी क्रमीक पुस्तकापलीकडे कांहीही वाचत नाहीत. प्राध्यापक देखील निव्वळ पाट्या टाकण्यापलीकडे लेखन वाचनाचा व्यासंग करतांना क्वचितच दिसतात. यामुळे विद्यार्थी हा निव्वळ परीक्षार्थी झालेला आहे. महाविद्यालये आणि विद्यापिठे ही पदवी देणारे कारखाने झालेले आहेत. वाचनाची गरजच भासत नसल्याने, वाचन वृत्ती लोप पावत चालली असावी- असे म्हणावे का?

ग्रंथालये आणि वाचक यांची ही रोगट अवस्था बघून लेखक वर्ग निराश होण्याची शक्यता आहे. हजार पुस्तकांची आवृत्ती संपायला कधी कधी दहा, वीस वर्षे थांबावे लागते. पुस्तके खपतात - पण ती कुठली? धंदेवाईक पोटभरु प्रकाशक आपली चोथा पुस्तके जास्तीत जास्त कमीशन देऊन संस्था प्रमुखांच्या गळ्यात मारताना दिसतात. बिचाऱ्या वाचकांनाही हा 'चोथा' चघळावा लागतो. ही त्याना खरोखरच शिक्षा आहे..... पण हेही कळावे लागते, कळले तरी एकटा वाचक कांही करू शकत नाही....

ग्रंथालये ही अव्यवस्थेच्या व उपेक्षेच्या कचाट्यात सापडलेली असल्याने हवे ते मासिक अथवा पाहिजे ते पुस्तक मागून मिळेल याची खात्री नसते. एखाद्या पुस्तकासाठी किती काळ वाट बघायची याची मर्यादा असत नाही. नियम सगळीकडे असतात. पण नियम, कायदे हे पाळण्यापेक्षा ते मोडण्याकडेच कल आढळून येतो. म्हणून ग्रंथालयाच्यां नियमांना वाचक धूप घालत नाहीत. पुस्तके कशी वापरावीत याची बऱ्याच वाचकांना अक्कल असत नाही. चांगली चांगली पुस्तके फाडून, मजकुरावर वाटेल तशा रेघोट्या मारून, बांधणी खिळखिळी करून ग्रंथालयाकडे परत केली जातात-हा अनुभव खिन्न करणारा आहे.

आज साहित्यात अनेक चळवळी रूढ झालेल्या आहेत. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, पांढरपेशी शहरी साहित्य असे अनेक प्रकार मराठी साहित्यात प्रचलित झालेले आहेत. ग्रामीण भागात राहाणाऱ्या सत्तर ऐंशी टक्के लोकांची भाषा हीच खरी मराठी भाषा असे बोलले जात आहे. आम्ही इतकी वर्षे उपेक्षित राहिलो, आता आमचा आवाज कुणी दडपून टाकू शकणार नाही या आवेशाने लिहिणारे संतप्त दलित लेखक आपले जीवनानुभूतीचे अनुभव लिहीत आहेत आणि शहरी वाचक ते वाचून अचंबित होत आहेत. जीवनाचे अनेक रंग आहेत. ज्याला ते जसे भावेल तसे त्याने ते चितारावे, श्रेष्ठ साहित्य कशाला म्हणावे? माणसाच्या व्यक्तिगत जाणिवेच्या छोट्या स्वार्थी वर्तुळातून सामाजिक जाणिवेच्या मोठ्या व्यापक वर्तुळात नेण्याचे कार्य जे साहित्य करते ते श्रेष्ठ साहित्य आणि असे साहित्य लिहिणारा तो श्रेष्ठ लेखक होय असे प्रा. करंदीकर म्हणतात ते अगदी यथार्थ आहे. असे हे श्रेष्ठ साहित्य वाचकापर्यंत पोहोंचवण्याचे कार्य ग्रंथालये करीत असतात. वाचक आणि लेखक या दोघामधला हा 'पूल' मजबूत आणि भक्कम असायला पाहिजे. आज तो दुर्लक्षित, उपेक्षित राहिलेला आहे. ही गोष्ट उद्वेगजनक आहे.

ग्रंथालयातली पुस्तके ही सर्वच ज्ञानशाखेवरची असतात. मराठीच्या लेखकांना समाजशास्त्राची, मानसशास्त्राची माहिती असणे आवश्यक वाटते. अर्थशास्त्र आणि व्यापारशास्त्राचे अध्यापक कथा, कादंबऱ्या व वैचारिक साहित्य आवडीने वाचतात- तेंव्हा नवल वाटत नाही. वाचकांचा चोखंदळपणा लक्षात घेतला पाहिजे. चर्चा, परिसंवाद, सभासंमेलने, मुलाखती आणि परीक्षणे या द्वारे नवीन पुस्तकांना प्रसिध्दी देता येणे शक्य आहे.

ग्रंथालये ही ज्ञानाची भांडारे असतात. न.वि. गाडगिळांच्या पावमिसळ या पुस्तकातला एक इंग्रजी विचारवंताचा


उतारा खालील प्रमाणे आहे.


Without books God is Silent
Justice dormant
Natural science at a stand
hilosopjy lame,
letters dumb abd things immersed
in darkness.

(ग्रंथाविना परमेश्वर स्तब्ध, न्याय निद्रिस्त, विज्ञान अगतिक, तत्त्वज्ञान पंगु, साहित्य मूक, आणि सर्व गोष्टी अंधारात अशी जगाची स्थिती झाली असती.)

पुस्तकाचे एवढे अनन्यसाधारण महत्त्व आहे तर ग्रंथालयाचे महत्त्व याहून मोठे असणे आवश्यक आहे. ज्ञान विज्ञानाच्या आणि साहित्यकलेच्या वाटेने जायचे तर ग्रंथालयांची सोबत अनिवार्य आहे. वाचकांना ग्रंथ हे मित्रासमान, गुरूसमान वाटतात याचे कारण हेच आहे. म्हणून सुजाण वाचकांची संख्या वाढली पाहिजे. आणि यासाठी साक्षरता आवश्यक आहे. निव्वळ लिहिता वाचता येऊन काम भागणारे नाही. आपल्याकडे शिकले सवरलेले लोक पुष्कळ आहेत. त्यानी पैसा हे मूल्य मानलेले आहे आणि त्या अनुषंगाने आयुष्याचे अवमूल्यनही झालेले आहे. हे चित्र बदलण्याचे कार्य साहित्यिक आणि विचारवंत करू शकतात- असे मला वाटते. कारण श्रेष्ठ साहित्य हे सामाजिक बदलाला अप्रत्यक्षपणे मदत करीत असते. माणसाला माणूस बनविण्याची क्षमता अशा साहित्यात असते. चळवळीची फलश्रुती ही आणि एवढीतरी असलीच पाहिजे.

□ □ □





सखाराम भीमराव कलाल

परिशिष्ट : २

## || सखा कलालांचे मनोगत ||

आपल्या देशात जातीजमाती अगणित आहेत. फार फार पूर्वी अशीच एक जमात उत्तरेकडून राजांच्या पराक्रमामुळे दक्षिणेकडे सरकली असावी. आपली हिंदी भाषा, दारू विक्रीचा धंदा या जमातीने अजूनही टिकवून धरलाय. या जमातीलाच कलाल म्हणतात. कलाल हा शब्द उच्चारला तरी कुणाही सद्वर्तनी, सुविचारी आणि समाजहितैषी व्यक्तीला घृणा वाटणे स्वाभाविक आहे. माणसाला जनावर करण्याचे बळ या दारूत आहे. आणि लोक तरी कसले... स्वत:हून गुत्त्याकडे जातात. पी पी पितात आणि गटारीत लोळतात. संसारातल्या सुखाला स्वत:च्या व्यसनात काही लोळवतात... एकदा सरून गेलेलं सुख पुन: परत नाही.

माझ्या आजीचं नाव सखुबाई. या बाईनं स्वत:च्या पोरांची या घाणेरड्या धंद्यापासून कायमची सुटका केली. तिची पोरं तिच्या शब्दाबाहेर नव्हती. शिक्षण नाही. जवळ पैसा नाही. शेतमजुरी आणि काबाडकष्टाची कामं करून, चांगल्या रीतीनं जगण्याचं बळ तिनं ~~तिनं~~ त्यांना दिलं. दारूड्याचं [illegible] उद्ध्वस्त कुटुंब बघून तिनं असं केलं असेल का?

माझ्या आईवर, आपल्या मोठ्या सुनेवर तिची खूप माया होती. ती सुनेला म्हणायची: बाई गं, मी मरून तुझ्या पोटी जन्माला येईन... काही गंभीर आजारानं आजारी असतांना सखुबाई वारली. ती गेल्यानंतर काही महिन्यातच मी जन्माला आलो. सखुबाईच पुन: जन्माला आली असं समजून माझं नाव सखाराम ठेवण्यात आलं. हा सर्व भावनेचा खेळ असला तरी माझ्या आजीच्या सद्गुणांची, सद्विचारांची शिदोरी मला मिळाली असावी असं मला वाटतं.

माझ्या जमातीची बहुतेक सर्व माणसं वळून लोकांना — पाजण्यात मग्न असतांना, गुत्त्यावर जाणून बुजून ग्रंथपालकीच्या ओढीनं सेवनही केलं. व्यवसायात गढून गेलो. मी अवलोकनात केवळ ग्रंथांनी. त्यांच्या आज माझ्या नावात किंवा आडनावात अभिमानाचा फरक... म्हणून काय फरक? हे पाहिलं मोठं पाहिजे. नसे काही नसते. कोणी हे पाहतानाना दिसत नाही — हे मोठं दुर्दैव आहे! पण समाजपुरक

सखा कलाल

## - संदर्भसूची -

**संदर्भग्रंथ :**

1) कुलकर्णी पंडित अनंत, यादव आनंद (संपा.), मातीतलं मोती, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, 1970

2) कुलकर्णी दा. वि., मराठी कथा : स्वरुप आणि आस्वाद, स्वाध्याय महाविद्यालय प्रकाशन, पुणे, 1976.

3) कुलकर्णी द.भि., तिस-यांदा रणांगण, विजय प्रकाशन, नागपूर, 1976.

4) कोतापल्ले नागनाथ, ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1985.

5) खांडेकर वि.स. (संपा.), पाच कथाकार, कान्टिनेंटल प्रकाशन, पुणे, 1981.

6) माडगूळकर अंबादास, खांडेकर सूर्यकांत (संपा.), मराठी ग्रामीण कथा, लेखन वाचन भांडार, पुणे, 1979.

7) पवार गो. मा., हातकणंगलेकर म.द. (संपा.), मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 1986

8) मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा : स्वरुप आणि विकास, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, 1992.

9) यादव आनंद, ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, 1979.

10) हातकणंगलेकर म.द., मराठी कथा : रुप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन, पुणे, 1986.

- - -

**नियतकालिके व वृत्तपत्र :**

1) दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका (जाने-फेब्रु-मार्च 1992), कोल्हापूर.

2) महाराष्ट्र साहित्य पत्रिका (जुलै-डिसेंबर 1980 ), पुणे,

3) दै. सकाळ, 22 ऑगस्ट 1991, (कोल्हापूर आवृत्ती)

- - -